सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

कार्यालय पोलीस अधीक्षक,

यवतमाळ

एल. आय. सी. चौक, यवतमाळ.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-mai IDsp.yavatmal@mahapolice.gov.ir

जा.क्र. – पोअय///२०२४/ यवतमाळ,

दुरध्वनी क्र. ०७२३२ - २५६७०१

दिनांक - दि. 06/04/25

**रामनवमी च्या पूर्वसंध्येला पो. स्टे उमरखेड हददीत उमरखेड पो. स्टे व स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ या पथकांची धडक कारवाई एक गावठी बनावटीचा देशी कटटा (पिस्टल) व दोन धारधार लोखंडी तलवार जप्त.**

यवतमाळ जील्हा पोलीस अधिक्षक मा. पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता (भा.पो.से) यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी व पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांना यवतमाळ जिल्हयात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे करणारे, अवैध शस्त्र (अग्नीशस्त्र) बाळगणा-यांना त्वरीत ताब्यात घेउन कायदेशीर कार्यवाहि करणे करीता सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी व पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केलेले आहे. आगामी काळात येणारे सण उत्सव शांततेत साजरे होणेकरीता पोलीस विभाग गैरकृत्य करणा-यांवर विशेष लक्ष ठेउन आहे.

रामनवमी उत्सवाचे अनुषंगाने दिनांक 05/04/2025 रोजी उमरखेड पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी शंकर पांचाळ व पोलीस निरीक्षक सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांच्या संयुक्त मार्गदर्शनात दोन वेगवेगळी पथके तयार करुन उमरखेड पोलीस स्टेशन हददीत कारवाई करण्याचे आदेशित केले होते. त्याप्रमाणे पोउपनिरी/सागर इंगळे व त्यांचे पथकांने मिळालेल्या गोपनिय माहीती नुसार इसम नामे विजय गणेश भिमेवाड रा. शिवाजी वार्ड उमरखेड ता.उमरखेड यास चुरमुरा डॅम परिसरातून शिताफिने ताब्यात घेण्यात आले, त्याची झडती घेतली असता त्याचे कमरेला एक गावठी बनावटिचा देशी कटटा, (पिस्टल) व मैगजीन त्यामध्ये 6 राउड किंमत 15,000 रु. असे मिळून आल्याने सदर मुद्देमाल जप्त करुन विजय गणेश भिमेवाड यास ताब्यात घेतले.

त्याच प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ पथकांस मिळालेल्या गोपनिय माहीती नुसार इसम नामे-शोएब ऊर्फ शेख इब्राहीम शेख रहीम रा. अहेबाब कॉलनी उमरखेड यांचे घरी जावून त्याचे घराची पंचा समक्ष घरझडती घेतली असता त्याचे कडे दोन लोखंडी धारधार तलवार किंमत 3500 रु.ची मिळून आल्याने ते जप्त करुन ताब्यात घेतले.

अशा प्रकारे गुन्हे प्रगटीकरण पथक उमरखेड व स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी रामनवमी सणाच्या पूर्व संध्येला संयुक्तीकरित्या इसम नामे 1) विजय गणेश भिमेवाड वय 23 वर्ष रा.शिवाजी वार्ड उमरखेड ता.उमरखेड जि. यवतमाळ यास ताब्यात घेवून त्यांच्या विरुध्द उमरखेड पोलीस स्टेशन येथे कलम 3, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये तसेच 2) इसम नामे शोएब ऊर्फ शेख इब्राहीम शेख रहीम वय 20 वर्ष, रा. अहेबान कॉलनी उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांच्या विरुध्द उमरखेड पोलीस स्टेशन येथे कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद केला.

सदरची कारवाई यवतमाळ जील्हा पोलीस अधिक्षक मा. पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता (भा.पो.से), मा. अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ श्री. पियुष जगताप, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक श्री. सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, पोलीस निरीक्षक श्री. शंकर पांचाळ, उमरखेड पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक गजानन गजभारे, सहा. पोलीस निरीक्षक पांडुरंग शिंदे, पोउपनि शरद लोहकरे, स्थागुशा यवतमाळ, पोउपनि सागर इंगळे गुन्हे प्रगटीकरण पो. स्टे. उमरखेड, पोहवा/संतोष भोरगे, पोहवा तेजाब रणखांब, पोहवा/सुभाष जाधव, पोहवा रमेश राठोड, पोहवा/कुणाल मुंडोकार, पोशि/सुनिल पंडागळे, चापोकॉ राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, पोहवा/दिनेश चव्हाण, पोहवा/गिरीष बेंद्रे, पोशि/संघशिल टैंभरे, पोशि/निवृत्त महाळनर, पोशि/प्रफुल घुसे पोलीस स्टेशन उमरखेड यांनी संयुक्तरित्या यशस्वीपणे पार पाडली आहे.

शुभांगी रा.गुल्हाणे

जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

Scanned with OKEN Scanner